MHKO180004262023

**नियमीत दिवाणी दावा क्र.१३१/२०२३ मधील**
**निशाणी क्र.१४ खालील आदेश.**
**(अमोल पाटील वि. देवगोंडा पाटील आणि १)**

वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम VI नियम १७ आणि कलम I नियम १० अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०२. वादी यांच्या विद्यमान वकीलांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये असे नमूद केले आहे की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा दावा मिळकतींचे वाटप होवून मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ यांच्यासोबत बेकायदेशीरपणे दुसरे लग्न केले असून सदर लग्नसंबंधातून प्रतिवादी क्र.१ व २ यांना भाग्यश्री व राजश्री अशा दोन मुली असून दोघींचेही लग्न झाले आहे. परंतू, प्रस्तुत दावा दाखल करतेवेळी दाव्यातील सरनाम्यामध्ये भाग्यश्री व राजश्री यांची नावे नमूद करण्याचे वादी यांच्याकडून अनावधानाने राहून गेले आहे. तसेच, प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या बेकायदेशीर लग्नाबाबत व सदर लग्नसंबंधातून भाग्यश्री व राजश्री यांचा जन्म झाल्याबाबत दाव्यामध्ये नमूद करावयाचे वादी यांच्याकडून अनावधानाने राहून गेले आहे. प्रस्तुत दावा दाखल केल्यानंतर वादी यांना सदरची चुक अवगत झाली. उपरोक्त नमूद चूक अनावधानाने व नजरचुकीने झालेली असल्यामुळे त्याबाबत दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करण्याकरीता वादी यांना प्रस्तुत अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. प्रस्तुत नमुद दुरुस्ती मंजुर केल्यास आणि भाग्यश्री व राजश्री यांना प्रस्तुत दाव्यामध्ये पक्षकार म्हणून सामाविष्ट केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात यावा, अशी विनंती वादी यांच्या विद्यमान वकीलांनी केली आहे.

०३. प्रतिवादींनी निशाणी क्र.१५ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जास हरकत घेतली आहे. प्रतिवादींच्या विद्यमान वकीलांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये नमूद केले आहे की, वादी यांनी प्रस्तुत दावा दाखल करतेवेळी हेतुपुरस्सरपणे भाग्यश्री व राजश्री यांना प्रस्तुत दाव्यामध्ये पक्षकार म्हणून सामाविष्ट केले नाही. त्याबाबत, प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये हरकत घेतल्यानंतर वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती प्रतिवादींच्या विद्यमान वकीलांनी केली आहे.

०४. दावा, प्रस्तुत अर्ज व निशाणी क्र.१५ वर प्रतिवादींनी दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन करण्यात आले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते

की, प्रस्तुतचा दावा दावा मिळकतींचे वाटप होवून मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रस्तुतचा दावा दाखल करीत असतेवेळी दाव्यातील सरनाम्यामध्ये भाग्यश्री व राजश्री यांची नावे नजरचुकीने व अनावधानाने नमूद करावयाची राहून गेल्यामुळे सदर दोष दुरुस्त करण्याकरीता वादी यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. तसेच, प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या बेकायदेशीर लग्नाबाबत व सदर लग्नसंबंधातून भाग्यश्री व राजश्री यांचा जन्म झाल्याबाबत दाव्यामध्ये नमूद करावयाचे वादी यांच्याकडून नजरचुकीने व अनावधानाने नमूद करावयाची राहून गेल्यामुळे सदर दोष दुरुस्त करण्याकरीता वादी यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्याचा गुणवत्तेवर निकाल लावण्याकरीता आवश्यक असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत आहे. तसेच, दाव्याचा गुणवत्तेवर निकाल लावण्याकरीता भाग्यश्री व राजश्री हे आवश्यक पक्षकार असल्याचे दिसून येत आहे. वादी यांना प्रस्तुत अर्जामधील प्रस्तावित दुरुस्ती करण्यास आणि भाग्यश्री व राजश्री यांना प्रस्तुत दाव्यामध्ये सामाविष्ट करण्यास परवानगी दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे व दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, वरील सर्व बाबींचा विचार करता, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर करणे न्यायोचित होईल. वादी यांना प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब विचारात घेता, प्रस्तुतचा अर्ज एक हजार रुपये इतक्या खर्चासह मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :-

:: **आदेश** ::

१. प्रस्तुत अर्ज रक्कम रुपये १,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक हजार फक्त) इतक्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी पुढील तारखेपर्यंत दाव्यामध्ये अर्जातील नमुद दुरुस्ती करुन दाव्याची दुरुस्ती प्रत प्रस्तुत दाव्यात दाखल करावी. तसेच, दुरुस्त दाव्याची प्रत्येकी एक प्रत प्रतिवादींना द्यावी.

३. वादी यांनी खर्चाची रक्कम रुपये १,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक हजार फक्त) ही प्रतिवादी क्र.१ व २ यांना द्यावी.

४. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2024.11.04 16:52:40 +0530

दिनांक : ०४.११.२०२४
कुरुंदवाड.

(बाळासाहेब श्री. गायकवाड)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर ,
कुरुंदवाड.